ePaper **‘कितीही डुबक्या मारा गद्दारीचा शिक्का पुसला जाणार नाही’ : उद्धव ठाकरे**



| वर्ष - 8 | अंक - 223 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 28 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- आरसीबीची पराभवाची हॅटट्रिक!
- पाकिस्तानच्या नावे लाजिरवाणा विक्रम
- लाखोंच्या साक्षीने महाकुंभ समाप्त
- निवडणूक आयोगाबद्दल आदर होता!

## स्वारगेट अत्याचार प्रकरण

# अखेर 70 तासानंतर दत्ता गाडेच्या नांग्या ठेचल्या!

## मध्यरात्री दीड वाजता मोठ्या थरारानंतर पोलिसांनी नराधमाला घेतले ताब्यात





| मुंबई-पुणे | प्रतिनिधी | महाईन्यूज

**पुण्यात स्वारगेट आगारात एका २६ वर्षीय मुलीवर शिवशाही बसमध्ये अत्याचार झाल्याची खळबळजनक घटना घडली. आरोपी दत्तात्रय गाडे याच्या शोधात पोलिस गेल्या काही तासांपासून होती. पोलिसांनी अखेर मोठ्या प्रयत्नानंतर आरोपीला ताब्यात घेतले असून त्याला दुपारी आज कोर्टात हजर केले जाणार आहे.**

पुणे बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे याला अखेर अटक करण्यात आली आहे. दत्तात्रय हा शिरूर येथील गावातील शेतात लपला होता. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांच्या 13 टीम तयार करण्यात आल्या होत्या. तो शोध गावातच लपल्याचं लोकेशन ट्रेस झाल्यानंतर तो गावातून पळू नये म्हणून गावात 100 पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला होता. डॉग स्क्वायड आणि ड्रोनच्या मदतीने त्याचा शोध घेण्यात आला. अखेर 48 तासानंतर पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, 37 वर्षीय आरोपी दत्तात्रय रामदास गाडे याला शिरूर, पुणे येथून अटक करण्यात आली आहे. रात्री उशिरा तो कोणाच्या तरी घरी जेवायला गेला होता, त्याच व्यक्तीने त्याची माहिती पोलिसांना दिली. गुरुवारी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास आरोपीला अटक करण्यात आली असून त्याला आज पुणे न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची देखील माहिती मिळत आहे. धक्कादायक गोष्ट म्हणजे, आरोपीवर यापूर्वी देखील अनेक आरोप झाले आहेत. आरोपी गाडे याच्यावर यापूर्वी चोरी, दरोडा, चेन स्नॅचिंग यांसारखे गुन्हे दाखल आहेत. 2019 मध्ये एका गुन्ह्यात आरोपीची जामिनावर सुटका झाली होती. आरोपी गेल्या दोन दिवसांपासून फरार होता. फरार आरोपीला शोधण्यासाठी पोलिसांच्या 13 टीम तयार करण्यात आल्या होत्या. याप्रकरणी पुणे पोलिसांनी आरोपींची माहिती देणाऱ्यास एक लाख रुपयांचे बक्षीसही जाहीर केलं होतं.

### रात्री दीडला मोठा थरार

शेवटी पोलिसांनी या आरोपीला ताब्यात घेतले आहे. मोठ्या थरारानंतर मध्यरात्री दीडच्या सुमारास त्याला पकडण्यात पोलिसांना यश मिळाले. आरोपी दत्तात्रय गाडे हा गुणाट येथील ऊसाच्या शेतात लपून बसला होता. ड्रोनच्या माध्यमातून पोलिसांना तो दिसला. मात्र, रात्रीच्या अंधारात त्याला शोधण्यास पोलिसांना अडथळा येत होता. शेवटी अनेक प्रयत्न केल्यानंतर तो पोलिसांच्या ताब्यात आला. त्याला पुण्यात रात्रीच आणले गेले.

आज त्याला कोर्टात हजर केले जाईल. आरोपीला शोधण्यासाठी पोलिसांकडून तब्बल तेरा पथके तयार करण्यात आली होती. आरोपीचा ठिकाणा लागल्यानंतर गुणाट गावात पोलिसांचा मोठा फौजफाटा दाखल झाला होता.

## स्वारगेट प्रकरणाची केस ‘फास्ट ट्रॅक’ वर !

**पुणे:** पुण्यातील स्वारगेट परिसरात बसमध्ये युवतीवर झालेल्या भयावह अत्याचारानंतर पीडित युवतीचा आलेला मेडिकल रिपोर्ट अत्यंत धक्कादायक असाच आहे. दरम्यान, या प्रकरणातील लिंगपिसाट आरोपी अद्यापही पसार असून त्याचा शोध सुरू आहे. या प्रकरणाची राष्ट्रीय महिला आयोगाने गंभीर दखल घेतली असून हा खटला वफास्ट ट्रॅक कोर्टा’ मध्ये चालवावा, यासाठी पोलीस महासंचालकांची आयोगाने संपर्क साधला आहे. आज तिसऱ्या दिवशीही सरकारी यंत्रणांची प्रचंड पळापळ झाली.

## मेडिकल रिपोर्टमध्ये नक्की काय?

या पीडित तरुणीचा मेडिकल रिपोर्ट हाती आला असून त्यामुळे अनेक खुलासे होणार आहेत, अनेक संशयास्पद मुद्द्यांवर प्रकाश पडणार आहे. हा अतिशय गोपनीय अहवाल पोलीस खात्याकडे सोपविण्यात आला आहे. मात्र, शिवशाही बसमध्ये त्या युवतीवर एकदा नव्हे दोन वेळा अत्याचार झाले, असा उल्लेख त्या अहवालामध्ये असल्याचे सांगण्यात येते. त्याचप्रमाणे, अन्य काही बाबींवरही अहवालात दृष्टीक्षेप टाकण्यात आला आहे.

## राष्ट्रीय महिला आयोग सतर्क

या अत्याचार प्रकरणाची राष्ट्रीय महिला आयोगाने गंभीर दखल घेतली असून अध्यक्षा विजया रहाटकर यांनी थेट पोलीस महासंचालकांशी संपर्क साधला आहे. ही घटना खूपच धक्कादायक असल्याचे सांगून रहाटकर यांनी सु- मोटो याचिका दाखल केली आहे. रहाटकर यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला, त्यावेळी त्यांनी स्पष्ट केले की या धक्कादायक घटनेनंतर हा खटला ‘फास्ट ट्रॅक’ कोर्टातच चालवणे महत्त्वाचे आहे. पीडित महिलेची सुरक्षा आणि तिचे मानसिक आरोग्य सांभाळणे, हे प्रथम कर्तव्य असल्याचे त्या म्हणाल्या. तीन दिवसात पोलिसांनी अहवाल देण्याचे आदेश रहाटकर यांनी दिले आहेत.

## आधी सुरक्षा ऑडिट करा..

रहाटकर पुढे म्हणाल्या, की अशाच प्रकारच्या आणखी काही घटना समोर आल्या आहेत. महिलांच्या सुरक्षेसंदर्भातील सर्व घटनांमध्ये राष्ट्रीय महिला आयोग महत्त्वाची भूमिका बजावणार असून सर्व बसेसचे आणि बस स्थानकांचे सुरक्षा ऑडिट महत्वाचे आहे अशी पुष्टीही त्यांनी जोडली.

# बलात्कारी मोकाट, इनाम कसले जाहीर करता?

## दिवसाआड खून, कोयता गँगची दहशत आणि बसमध्ये बलात्कार

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**स्वारगेट बस स्थानकावर उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये तरुणीवर बलात्कार होऊन दोन दिवस उलटले आणि आरोपी मोकाट सुटलेला असताना आज घटनास्थळी भेट देणाऱ्या गृहराज्यमंत्री कदम यांची गाडी अडवत संतप्त महिलांनी अडविण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांनी तृप्ती देसाई यांच्यासह ५० महिलांना ताब्यात घेतल्याने हे प्रकरण आणखी तापले आहे.**




बुधवारी पहाटे पाचच्या सुमारास पुण्यातील स्वारगेट बस स्थानकावर शिवशाही बसमध्ये एका तरुणीवर बलात्कार झाला. अत्याचार करून पसार झालेला आरोपी बस स्थानकातील सीसीटीव्हीत कैद झाला. दत्तात्रय रामदास गाडे वय ३५ हा शिक्रापूर मधील आरोपी असल्याचे निष्पन्न झाले असून त्याला अटक करण्यासाठी पोलिसांची आठ पथके रवाना झाली आहेत. या घटनेला आता दोन दिवस उलटले तरी आरोपी पकडला जात नसल्याने पुण्यात महिला आणि सामाजिक संघटना संतप्त झाल्या असून आज घटनास्थळी भेट देण्यासाठी येत असलेले गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या वाहनांचा ताफा अडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या भूमाता ब्रिगेडच्या प्रमुख तृप्ती देसाई यांच्यासह पन्नास महिलांना पुणे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या घटनेची माहिती मिळताच ठाकरे गटाचे वसंत मोरे यांनी स्वारगेट बस स्थानकावर आंदोलन करीत बस्थानाक फोडले, दरम्यान पोलिसांनी आरोपी दत्तात्रय गाडे याला पकडून देणार्याला एक लाखाचे बक्षीस जाहीर केल्याने आणखी पुण्यातील जनमत खवळले असून अश्या टिनपाट आरोपीना पकडण्यासाठी पुणे पोलिसांना बक्षीस जाहीर करावे लागत असेल तर पोलीस काय करतात असा सवाल विचारला जात आहे.

स्वारगेट बस स्थानकावर पोलिसांची गस्त असते हे लक्षात आले आहे, आरोपीच्या शोधार्थ पोलिसांची आठ पथके पाठविण्यात आली आहेत. हा आरोपी ग्रामीण भागातील आहे, सीसीटीव्ही यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी आदेश देण्यात आले असून रेकॉर्डवरील आरोपी कॅमेऱ्यात दिसल्यास यापुढे ट्यूबचे अलर्ट पोलिसांना मिळतील अशी माहिती आज गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



सर्वात सुरक्षित शहर समजले जाणाऱ्या पुण्यात गेल्या काही वर्षात कायदा आणि सुव्यवस्था बिघडली आहे, पुण्यात पोलीस आयुक्त कोण आहेत ? पालकमंत्री कोण आहेत ? दररोज पुण्यातून गुन्ह्याच्या बातम्या कानावर येतात आणि आता मुलींवर वर्दळीच्या ठिकाणी बलात्कार होत असतील तर महिलांच्या सुरक्षेचे काय हा प्रश्न या लोकांना पडत नाही का ? असा सवाल करून ठाकरे गटाचे प्रवक्ते खा, संजय राऊत यांनी विचारला आहे. बक्षीस जाहीर करून पोलसांनी स्वतःच्या उणीव जाहीर केल्या आहेत असेही राऊत यांनी म्हटले आहे.

### मुसक्या आवळा आणि फरफटत आना



पुण्यात अगोदरच दर दोन दिवसात एक खून होतो, त्यात कोयता गँगचा धुमाकूळ अजूनही थांबला नाही, अश्यातच बसमध्ये झालेल्या बलात्काराने पुणे पोलीस आणि पालकमंत्री यांची पकड ढिली असल्याचे स्पष्ट झाले आहे त्यामुळे आज बसमध्ये अत्याचार झाला उद्या आपल्या घरात घुसून अत्याचार होतील अशी भीती पुण्यातील महिलांना असल्याने बक्षीस जाहीर काय करता ? मुसक्या आवळा आणि फरफटत आना असे आव्हान तृप्ती देसाई यांनी दिले आहे.

# कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे

## बलात्कार प्रकरणावर माजी सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांची प्रतिक्रिया

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील स्वारगेट बसस्थानकात उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये एका २६ वर्षीय महिलेवर बलात्कार झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणातील आरोपीला अटक करण्यासाठी १३ पथके स्थापन करण्यात आली आहेत. इतकेच नाही तर पोलिसांनी आरोपीची माहिती देणाऱ्यासाठी १ लाख रुपायांचे बक्षीस देखील जाहीर केले आहे. या धक्कादायक प्रकारानंतर राजकीय वर्तुळातून संतप्त प्रतिक्रिया दिल्या जात आहेत.**



यादरम्यान भारताचे माजी सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी देखील या प्रकरणाबद्दल प्रतिक्रिया दिली आहे.पुण्यात झालेल्या बलात्काराच्या घटनेवर माजी सीजेआय डी. वाय चंद्रचूड यांनी प्रतिक्रिया देताना कायद्याच्या योग्य अंमलबजावणाचा मुद्दा उपस्थित केला आहे.

पीटीआय या वृत्तसंस्थेशी बोलताना चंद्रचूड म्हणाले की, “आपल्याकडे विशेषतः निर्भया बलात्कार प्रकरण झाल्यानंतर कायद्यात अनेक बदल करण्यात आले. फक्त कायद्याच्या माध्यमातूनच आपण अशा घटना कमी करू शकत नाहीत, कायद्याशिवायही समाजावर देखील मोठी जबाबदारी आहे आणि कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. समाजात मोठ्या प्रमाणात महिला नोकरी, शिक्षणासाठी घरापासून दूर जाऊन काम करत आहेत. त्यामुळे प्रत्येक स्तरावर महिलांसाठी तयार करण्यात आलेल्या कायद्यांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी झाली पाहिजे, जेणेकरून महिला जेथे कुठे जातील तेथे त्यांना सुरक्षित वाटेल.”चंद्रचूड पुढे बोलताना म्हणाले की, “असे उदाहरण समोर आल्यानंतर त्याच्या विरोधात कठोरात कठोर कारवाई करणे , योग्य पद्धतीने तपास होणे, लवकरात लवकर सुनावणी होऊन शिक्षा होणे हे खूप गरजेचे आहे. न्यायव्यवस्था आणि पोलिसांची यामध्ये मोठी जबाबदारी आहे.

प्रत्येक स्तरावर आपण यावर लक्ष देऊन विचार केला पाहिजे, जेणेकरून आपण एक नवीन समाजाकडे पुढे जाऊ शकू, जेथे आपल्या समाजातील अर्धा हिस्सा असलेल्या महिला सुरक्षितपणे नोकरी, शिक्षण अशी प्रत्येक गोष्ट करू शकतील,” असेही चंद्रचूड म्हणाले.पुण्यातील स्वारगेट एसटी बस स्थानकातील शिवशाही बसमध्ये एका २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार झाल्याची घटना बुधवारी सकाळी उजेडात आली.

या प्रकारानंतर सर्वपक्षीय नेत्यांनी संताप व्यक्त केला असून पोलिसांनीही आरोपीच्या शोधासाठी १३ पथके तैनात केली आहेत. आरोपी सराईत गुन्हेगार होता, त्याच्यावर याआधी अनेक गुन्हे दाखल असून तो सध्या जामिनावर असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. आरोपीचा शोध घेण्याकरता पुणे पोलिसांनी १ लाखांचे बक्षिसही जाहीर केलेअसून त्याच्या कुटुंबियांची चौकशी सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणात स्वारगेट स्थानकात तैनात असलेल्या २३ सुरक्षा रक्षकांचं निलंबन करण्यात आलं आहे.

### समाजावर देखील मोठी जबाबदारी

पीटीआय या वृत्तसंस्थेशी बोलताना चंद्रचूड म्हणाले की, “आपल्याकडे विशेषतः निर्भया बलात्कार प्रकरण झाल्यानंतर कायद्यात अनेक बदल करण्यात आले.कायद्याशिवायही समाजावर देखील मोठी जबाबदारी आहे आणि कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. समाजात मोठ्या प्रमाणात महिला नोकरी, शिक्षणासाठी घरापासून दूर जाऊन काम करत आहेत.

## मालमत्ताधारकांना थकीत कर भरण्याचे आवाहन


# जप्त मालमत्तांचा आता लिलाव होणार..!

### जप्त मालमत्ताधारकांना मालमत्ता कर भरण्याची अखेरची संधी

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाकडून महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्ता कर थकविणाऱ्या बिगरनिवासी, व्यावसायिक व मिश्र मालमत्तांवर माहे डिसेंबर २०२४ ते माहे फेब्रुवारी २०२५ या दरम्यानच्या कालावधीत आज अखेर तब्बल ८७७ मालमत्ता जप्त केल्या आहेत. १० फेब्रुवारीपर्यंत जप्त करण्यात आलेल्या ७५९ बिगरनिवासी, व्यावसायिक व मिश्र मालमत्तापैकी ३२१ बिगरनिवासी, व्यावसायिक व मिश्र मालमत्ताधारकांनी मालमत्ताकराची संपूर्ण थकीत रक्कम महानगरपालिकेकडे जमा केल्याने जप्त केलेल्या त्यांच्या मालमत्ता मुळ मालकाच्या ताब्यात देणेत आल्या आहेत.**






उर्वरित ४३८ बिगरनिवासी, व्यावसायिक व मिश्र मालमत्ताधारकांच्या मालमत्तेची यादी लिलावाचा भाग म्हणून दि. ११ फेब्रुवारी २०२५ रोजीचे दै.सकाळ, दै. महाराष्ट्र टाईम्स, दै. लोकमत, दै. लोकसत्ता, दै. आज का आनंद, दै. नवभारत टाईम्स, दै. प्रभात, दै. पुण्यनगरी, दै. सामना, दै. सिव्हिक मिरर अशा सर्व वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात आली. या यादीतील थकबाकीदार मालमत्ताधारकांकडून २५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत थकीत कर भरण्याची संधी देण्यात आली होती. या संधीचा लाभ घेऊन ३६ मालमत्ताधाराकांनी थकीत कराचा संपूर्ण भरणा केला असून ३६ मालमत्ताधारकांनी आंशिक भरणा केला आहे. उर्वरित, मालमत्ताधारकांच्या मालमत्तांची लिलावाची प्रक्रिया वेगाने सुरु करण्यात आली आहे. तथापि उपरोक्त प्रक्रियेस अजून ०५ दिवसांचा कालावधी जावयाची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे थकीत मालमत्तांचे मालमत्ताधारकांना कराचा भरणा करण्यासाठी दि. ५ मार्च २०२५ रोजी पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे. दिनांक ५ मार्च २०२५ पूर्वी जे मालमत्ताधारक संपूर्ण कराचा भऱणा करणार नाहीत अशा मालमत्ताकरावर अधिकचा १५ टक्के लिलाव खर्च लावण्यात येणार आहे. त्यामुळे दि. ५ मार्च २०२५ पर्यंत कराचा भरणा करावा अन्यथा सदर मालमत्तांचा महानगरपालिकेकडून दि. ५ मार्च २०२५ नंतर लिलाव करण्यात येणार आहे. त्याचबरोबर जर सदर मालमत्ता लिलावामध्ये विकली गेली नाही तर १ रुपयाच्या नाममात्र बोलीवर महानगरपालिका सदर मालमत्ता खरेदी करणार आहे असे कर आकारणी व कर संकलन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

> “ शहरातील ८७७ बिगरनिवासी, व्यावसायिक व मिश्र मालमत्तांवर जप्तीची कारवाई करण्यात आली असून यामध्ये ४०२ मालमत्ताचा लिलाव करण्यात येणार आहे. लिलावास पात्र मालमत्तांची यादी यापूर्वीच सर्व वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्यात आली असून त्यांना २५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत मालमत्ता कर भरण्यासाठी संधी देण्यात आली होती. लिलाव प्रक्रिया सुरू करणेत आली असून अंतिम संधी म्हणून ते ५ मार्च २०२५ पूर्वी मालमत्ता कर भरून लिलावद्वारे विक्रीची कटू कारवाई टाळू शकतात.
>
> **–अविनाश शिंदे,**
> सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

### मालमत्तांची लिलावाची प्रक्रिया सुरु करणार !

शहरामध्ये मालमत्ताकराची थकबाकी असणाऱ्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई सुरु असून तात्काळ कर भरुन जप्तीची कारवाई टाळण्याचे आवाहन वारंवार करण्यात येत आहे. जप्त केलेल्या मालमत्तांपैकी ज्या मालमत्ताधारकांनी अद्यापही कराचा भरणा केला नाही अशा मालमत्तांच्या लिलावाची प्रक्रिया सुरु करणेत आली आहे. ज्या मालमत्ताधारकांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत अशा मालमत्ताधारकांनी थकीत कराचा संपूर्ण भऱणा ५ मार्च २०२५ पूर्वी करुन आपल्या मालमत्तेचा लिलाव टाळावा.

> “ लिलाव प्रक्रियेमध्ये असणाऱ्या मालमत्तांपैकी ज्या मालमत्तांच्या मालमत्ताधारकांनी थकीत कराचा आंशिक भरणा केला आहे, अशा मालमत्ता लिलाव प्रक्रियेतून वगळल्या जाणार नसून मालमत्तेचा लिलाव टाळण्यासाठी संपूर्ण थकीत कराचा भरणा करणे आवश्यक आहे, असेही करसंकलन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्याचबरोबर, लिलाव प्रक्रियेमध्ये असणाऱ्या मालमत्तेच्या थकीत करावर अधिकचे १५ टक्के लिलाव खर्चही जोडण्यात येणार असून यामुळे सदर मालमत्तेच्या कराच्या थकीत रकमेमध्ये सुध्दा वाढ होणार आहे. प्रत्यक्ष लिलाव प्रक्रिया सुरु झालेनंतर मालमत्ताधारकांना मालमत्ता लिलावातून वाचवणेसाठी अत्यंत मर्यादित संधी असल्याने, मालमत्ताधारकांनी लिलावाची जाहीर सूचना प्रसिद्ध होईपर्यंत तात्काळ संपूर्ण थकीत कराचा भऱणा करुन लिलावाची प्रक्रिया टाळावी. असे आवाहन करसंकलन विभागाकडून करण्यात आले आहे.
>
> **–प्रदीप जाभंळे,**
> पाटील, अतिरिक्त आयुक्त (१), पिंपरी चिंचवड महानगरपालिका

---

## उन्नती सोशल फाऊंडेशनतर्फे मराठी राजभाषा दिन साजरा

### मराठी पुस्तकांचे वाटप; वाचनप्रेमी नागरिकांनी घेतला लाभ

। पिंपळे सौदागर ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहर कचरामुक्त करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने विविध उपक्रम सुरू केले आहेत. सार्वजनिक ठिकाणी टाकल्या जाणाऱ्या कचऱ्याची समस्या सोडवण्यासाठी असा परिसर स्वच्छ करून तेथे ‘सेल्फी पॉईंट’ केले जात आहेत. अशा जागांवर सेल्फी काढण्यासाठी नागरिकांचीही लगबग वाढू लागली आहे.**



पिंपरी चिंचवड शहरातील विविध सामाजिक कामांसाठी प्रसिद्ध असलेल्या उन्नती सोशल फाऊंडेशनतर्फे मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. पिंगळे सौदागर आणि रहाटणी मधील वाचनप्रेमी नागरिकांनी या पुस्तक वाटपाचा लाभ घेतला.


या उपक्रमामागील संकल्पना विशद करताना उन्नती सोशल फाऊंडेशनचे संस्थापक संजय भिसे म्हणाले, “मराठी वाचन संस्कृतीला गती देण्यासाठी फाउंडेशन नेहमीच कटीबद्ध आहे त्याचाच एक भाग म्हणून 5000 हून अधिक पुस्तकांचा संग्रह असलेले विठाई वाचनालय उन्नती सोशल फाउंडेशन तर्फे मोफत चालवले जाते. आज मराठी राज्यभाषा दिनाच्या निमित्ताने कवी कुसुमाग्रजांचे स्मरण करताना याच वाचन संस्कृतीला गती देण्यासाठी आणि नागरिकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी आम्ही अग्रनामांकित मराठी साहित्य वाचक प्रेमींमध्ये वाटप आहोत.”

यानिमित्ताने सखाराम ढाकणे म्हणाले “मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नाही, तर आपली संस्कृती, आपली परंपरा आणि आपली ओळख आहे. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते लोकमान्य टिळक, बाबासाहेब पुरंदरे, पु.ल. देशपांडे यांसारख्या महान व्यक्तींनी मराठीच्या माध्यमातून समाजाला दिशा दिली. आजच्या डिजिटल युगात इंग्रजी आणि इतर भाषांचा प्रभाव वाढत असताना, आपण मराठीचा अभिमान बाळगला पाहिजे. मराठीतून विचार मांडणे, लेखन करणे आणि तिचा प्रचार व प्रसार करणे ही आपली जबाबदारी आहे.”

### कार्यक्रमास यांची उपस्थिती...

याप्रसंगी डॉ. सुभाषचंद्र पवार, रमेश वाणी, सखाराम ढाकणे अनिल कुलकर्णी, बाळकृष्ण चौधरी , रमेश चांडगे, रमेश जावळे, प्रा शिवाजी पाटील यांच्यासह विठाई वाचनालय चे सभासद , आनंद हास्य क्लबचे सभासद , ऑल सिनियर सिटीजन्स असोसिएशन चे सर्व सभासद तरुण वर्ग आणि पिंपळे सौदागर ग्रामस्थ आणि परिसरातील साहित्य प्रेमी नागरिक बंधू-भगिनी आदी उपस्थित होते.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### नामाचे प्रेम का येत नाही ?

आज इतकी वर्षे होऊन गेली तरीसुद्धा ज्ञानेश्वर, तुकाराम, समर्थ रामदास यांच्यासारख्या थोर संतांचे नाव टिकून राहिले आहे. याचे खरे कारण हे की, त्यांचे नामावर अत्यंत प्रेम होते. या सर्व संतांच्या वचनांवर आपण विश्वास ठेवतो. त्यांच्याप्रमाणे नामाचे प्रेम आपल्यालाही यावे असे आपल्याला वाटते. पण ते प्रेम आम्हाला का उत्पन्न होत नाही, याचा विचार आपण करायला पाहिजे. त्या नामाला उपमा देताना, ते अमृतापेक्षाही गोड आहे असे त्यांनी सांगितले. नामाला अमृताची उपमा देताना, त्या अमृताच्या पलीकडे दुसरी गोष्टच नाही असे आपण म्हणतो. मग त्या नामाचे प्रेम आम्हाला का बरे नसावे ? तर त्या नामाच्या आड काही तरी येत असले पाहिजे हे खास. ज्याप्रमाणे आपण तोंडात साखर घातल्यावर आम्हाला जर ती गोड लागली नाही, तर तो दोष साखरेचा नसून आमच्याच तोंडाला चव नाही असे आपण म्हणतो, त्याप्रमाणे नामाची गोडी आमच्या अनुभवाला येत नसेल, तर आमच्यामध्येच काही तरी दोष असला पाहिजे खास. नामाचे प्रेम येण्याला बहुतेक लोक काही ना काही अडचणी सांगतात. कुणाला विचारले, “नामाचे प्रेम का येत नाही ?” तर तो सांगतो, “माझे लग्न झाले नाही. ते होऊन प्रपंच, मुलेबाळे हे सर्व झाल्यावर मला नामाचे प्रेम येईल.” पण लग्न करून मुलेबाळे असलेल्या किती लोकांना नामाचे प्रेम लागले आहे ? कोणी म्हणतो, “पैसा नाही म्हणून प्रपंचाची काळजी वाटते आणि नामाचे प्रेम येत नाही.” परंतु अगदी भरपूर पैसा असलेल्या किती लक्षाधीशांनी नामाचे प्रेम मिळविले आहे ? कोणी म्हणतो, “या प्रपंचात बायकोमुले, आजारपण, शेतीवाडी यांच्या व्यापामुळे आम्हांला नामाचे प्रेम लागत नाही;” तर कोणी म्हणतो, “प्रपंचात राहून मला आता कंटाळा आला आहे; मी आता संन्यास घेतो, म्हणजे मला नामाचे प्रेम येईल;” तर कोणी प्रापंचिक दु:खाला कंटाळून अगदी आत्महत्या करायला निघतो. अशा रीतीने, सर्वजण ज्या परिस्थितीत असतात त्या परिस्थितीत नामस्मरणाला अडचणच सांगत असतात. नामाचे प्रेम न यायला खरोखरच परिस्थिती कारणीभूत आहे का, याचा विचार आपण करायला पाहिजे. मला वाटते, नामाचे प्रेम न यायला खरोखर कारण कोणते असेल, तर भगवंत हवा असे आम्हाला मनापासून वाटतच नाही. भगवंत हवा आहे असे वाटणे, हे खरोखर भाग्याचे लक्षण आहे. तुम्हाला खरोखरच भगवंत हवा आहे असे वाटू लागले म्हणजे त्या हवेपणातच त्याच्या प्राप्तीचा मार्ग दिसू लागेल.

**बोधवचन:- नामाची गोडी अशी विलक्षण आहे की, ज्याला ती लागली त्याला स्वतःचे भान राहात नाही. म्हणून नामाला वाहून घ्यावे.**



**‘स्टेट’मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# शिंदेंनी साधला अचूक मोका, ‘मला, हलक्यात घेऊ नका’ !

**महाराष्ट्राच्या राजकारणात अत्यंत हुशार, धूर्त आणि कावेबाज नेता म्हणून एकनाथ शिंदे यांचा उल्लेख करावाच लागेल. त्यांनी उद्धव ठाकरे यांना धोबीपछाड कधी मारली आणि अलगद मुख्यमंत्रीपदावर कसे जाऊन बसले, हे अवघा महाराष्ट्र जाणतो ! आता चर्चेचा मुख्य मुद्दा असा आहे, की त्यांनी मारलेला डायलॉग सध्या सर्व राजकारणाच्या मेंदूत घुमत असेल. ‘मला हलक्यात घेऊ नका !’ असे एकनाथ शिंदे म्हणाले खरे..पण, ते नेमके कोणाला उद्देशून आहे, याचा शोध घेण्यातच राजकारण्यांचे दिवसामागून दिवस चालले आहेत.**

### एकनाथ शिंदेंनी सिद्ध केलंय..

महाराष्ट्राच्या राजकारणात ‘युती’ करून सत्तेची मलई खाणारे भाजपा आणि शिवसेना सत्तेच्याच संघर्षातून २०१९ ला फुटले. अर्थात् मुख्यमंत्रीपदाचा वाद आणि त्यातून अडीच वर्षे ठरले, न-ठरले अशा वादातून सर्वाधिक मोठा पक्ष असलेल्या भाजपाला सतेपासून रोखण्यासाठी त्यावेळी शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी वर्षानुवर्षांचे विरोधक असलेल्या आणि वंदनीय बाळासाहेबांना तिटकारा असलेल्या काँग्रेस आणि राष्ट्रवादीशी हातमिळवणी केली. या नवीन ‘जुळणी’ मुळे देवेंद्र फडणवीस यांच्या ‘पुन्हा येईन’ ला ब्रेक लागला. त्यावेळी सर्वच शिवसेनेतले तयार झाले असे नाही, त्यामुळे अडीच वर्षे आताचे ‘डेअरिंगबाज’ एकनाथ शिंदेही उद्धव ठाकरेंसोबत ‘मम’ म्हणून सत्तेचा लाभ घेत होते, हा इतिहासाचे ताजा आहे.

### राजकारणात नवी जुळवाजुळव..

सत्तेसाठी स्थापन झालेल्या ‘महाविकास आघाडी’ ला सुरुंग लावणे आणि उद्धव ठाकरेंना घडा शिकविण्यासाठी भाजपा सूडाने पेटली होती. त्याची सुरुवात साम-दाम-दंड-भेद या मार्गाने झाली. येथील भाजपाच्या हालचालींना केंद्रातील मोदी सरकारचा भक्कम पाठिंबा मिळाला आणि नव्या ‘महायुती’च्या राजकारणाची नांदी झाली.

शिस्तबद्ध आणि सूत्रबद्ध नियोजन करणाऱ्या भाजपाच्या हाताला एकनाथ शिंदे यांच्यासारखा मोहरा लागला. त्यातून एक-दोन नव्हे तर तब्बल पन्नास पेक्षा जास्त आमदारांनी शिवसेनेत बंड करून उद्धव ठाकरेंची सत्ता उलथवून टाकणाऱ्या एकनाथ शिंदेंना सहकार्य केले. त्याला



भक्कम शुभाशीर्वाद भाजपाने दिले. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांचा उल्लेख बरेचदा कुत्सितपणे दाढीवाला असा केला. शिंदेंनीदेखील अनेकदा भाषणात दाढीवाल्याला हलक्यात घेऊ नका, असा इशारा ठाकरे गटाला दिला. नंतर याच उदाहरण याची पुनरावृत्ती शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झाली आणि अजित दादांच्या नेतृत्वाखालील फुटलेल्या गटाने भाजपाची कास धरली.

### आघाडी विरुद्ध युती..

महाराष्ट्राच्या राजकारणात उघड उघड दोन गट पडले. भाजपा शिंदे गट आणि अजित दादा गट एकत्र आले, तर दुसरीकडे शिल्लक शिवसेना,शिल्लक राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांची हात मिळवणी झाली.

### लोकसभेला आपटी, विधानसभेला भरारी

लोकसभेला जरी महाविकास आघाडीला यश आले, तरी विधानसभेला त्यातून घडा घेत हवेत असलेल्या शिंदे-फडणवीस अजितदादा यांच्या माध्यमातून ‘लाडकी बहीण’ योजनेसह विविध मार्गांनी मोर्चेबांधणी झाली. त्यातून विधानसभेला तब्बल 238 हून अधिक जागा जिंकून महायुतीने सत्ता काबीज केली. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला मोठे बळ मिळाले. निवडणुकीत मोठे यश मिळविल्यानंतर ठाकरे गटातील अनेक नेते, नगरसेवक आपल्याकडे खेचून घेत शिंदे यांनी हा इशारा खरा देखील करून दाखविला. त्यांचे ‘ऑपरेशन टायगर’ अजूनही सुरू आहे. परंतु अलीकडील काळात एकनाथ शिंदे केवळ उद्धव ठाकरे गटासोबतच नव्हे तर फडणवीसांसोबतही लढत असल्याचे चित्र समोर येऊ लागले आहे.

### मुख्यमंत्रीपद न मिळाल्याची खंत

पुन्हा मुख्यमंत्रिपद मिळाले नाही, ही खंत अजूनही शिंदे यांच्या मनात आहेच. त्या पार्श्वभूमीवर दिल्लीतील साहित्य संमेलनाच्या सांगता समारोहात अजित पवारांनी ‘आपल्याला हलक्यात घेऊ नका,’ हा इशारा नेमका कुणाला? अशी विचारणा त्यांना केली. त्यावेळी एकनाथ शिंदेंनी हा प्रश्न टोलवून लावला खरा; परंतु त्यांच्या या इशाऱ्याची व्याप्ती वाढत असल्याचे दिसून येत आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकांना सातत्याने काही तरी कारणे सांगत ते अनुपस्थित असतात, अलीकडेच त्यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाला समांतर उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष सुरू केले आहे आणि त्यावर ते मुख्यमंत्री असताना ज्या कार्यकत्यांची त्यांनी कक्षप्रमुख म्हणून वर्णी लावली होती, त्याचीच पुन्हा नेमणूक केली आहे. विशेष म्हणजे फडणवीसांनी मुख्यमंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्या कार्यकर्त्यांची गच्छंती केली होती.

सोबतच, फडणवीसांनी शिंदे मुख्यमंत्री असताना घेतलेल्या अनेक निर्णयांना एकतर स्थगिती दिली आहे किंवा त्या निर्णयांचा पुनर्विचार सुरू आहे.

### फडणवीस यांचा नेहमीच कोलदांडा

मंत्र्यांचे स्वीय सहायक नेमतानाही फडणवीस यांनी आपल्या मान्यतेशिवाय अशी नेमणूक मान्य होणार नाही, असा फतवा काढला आहे. एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी प्रशासकीय अधिकारी नेमत मुख्यमंत्र्यांनी शिंदेंचे लाडके नेते प्रतापराव सरनाईक यांचे पंख छाटल्याचेही बोलले जात आहे. शिंदेच्या इतरही मंत्र्यांना आपल्याला खात्याच्या कामात स्वातंत्र्य नसल्याची तक्रार आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी उद्योग खात्याच्या परस्पर बैठका होत असल्याची तक्रार केली होती. तात्पर्य, शिंदे गट आणि फडणवीस यांच्यात सध्या ‘कोल्ड वॉर’ सुरू असल्याचे दिसते. या पार्श्वभूमीवर जिथे संधी मिळेल तिथे आपली नाराजी व्यक्त करण्याचे काम एकनाथ शिंदे करीत आहेत. मुख्यमंत्र्यांशी समांतर असा त्यांचा वेगळा कारभार सुरू आहे.

### बाहेर पडा, फरक पडत नाही!

शिंदे गट सत्तेतून बाहेर पडला तरी फडणवीस सरकारला कोणताही धोका नाही. राज्यात उपद्रवमूल्य जवळपास शून्य आहे, ही जाणीव असूनही एकनाथ शिंदे आक्रमक दिसत असतील तर त्यामागे कोणते गुपित आहे, हे कळायला मार्ग नाही. एकनाथ शिंदेचे भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांशी आणि खास करून अमित शाहांशी चांगले संबंध आहेत, शिवाय शिंदेकडे असलेले सात खासदार ही त्यांची जमेची बाजू आहे. कदाचित, त्या जोरावर ते राज्यात आपला प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न करीत असतील; परंतु, फडणवीसांना बाजूला सारून आपण मुख्यमंत्री होऊ, असे स्वप्न शिंदे पाहत असतील तर ती त्यांची मोठी चूक ठरू शकते. फडणवीरांच्या मागे मोदींचा वरदहस्त तर आहेच व त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे संघाचा संपूर्ण पाठिवा फडणवीसांना आहे. त्यामुळे शिंदे अधिकच आक्रमक झाले तर त्यांना कात्रजचा घाट दाखविला जाऊ शकतो.

### शिंदेंना सावध राहावे लागणार

शरद पवारांना आपल्या बाजूने खेचण्याचे प्रयत्न भाजपाने थांबविलेले नाही, तशीच वेळ आली तर उद्धव ठाकरेंनाही भाजप जवळ करू शकतो. अर्थात एकनाथ शिंदेना या सगळ्याची जाणीव असल्यामुळेच ते अधिक ताणून धरणार नाहीः परंतु त्यांची सध्याची भूमिका पाहता भाजपच्या वरिष्ठ नेत्याकडून त्यांना पाठबळ मिळत असावे, ही शक्यता नाकारता येत नाही.

एकूणच काय महाराष्ट्रातील राजकारण दोलायमान झाले आहे. भाजपा ही अत्यंत बलवान पार्टी झाली आहे, त्यामुळे वास्तविक, एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे दूर गेले तरी त्यांना फरक पडणार नाही. तो फरक या दोघांनाच पडू शकतो. एकनाथ शिंदे हळूहळू बुजुर्ग आणि अभ्यासू राजकारणी होऊ लागले आहेत. त्यामुळेच, त्यांनी दिलेला इशारा हा प्रत्येकालाच लागू होत आहे. तसा विचारही प्रत्येकजण करीत आहे, हे मात्र नक्की !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मराठीचा अभिमान बाळगा!

## शिवसेना नावाची ठिणगी पडली, तिचा वणवा झाला : ठाकरे

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**जमलेल्या माझ्या तमाम मराठी बांधवांनो आणि भगिनींनो. मी आता हे म्हटल्यावर उद्या पेपरमध्ये बातमी येणार उद्धव ठाकरेंनी हिंदुत्व सोडलं. पण मी मागेही म्हटलं होतं. हिंदुत्व म्हणजे धोतर नाहीये सोडायला. गर्व से कहो हम हिंदू है ही घोषणा बाळासाहेब ठाकरेंनी दिली होती. गर्व से कहो है हिंदू है ही घोषणा तर आपली आहेच. पण मी म्हणतोय की अभिमानाने आणि स्वाभिमानाने म्हणा की मी मराठी आहे. असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित खास कार्यक्रमात उद्धव ठाकरेंनी हे वक्तव्य केलं.**



१९६६ मध्ये मराठी माणूस थकलेल्या मानसिकतेत होता. त्या काळोखात एक ठिणगी पडली त्याचा वणवा झाला ती ही शिवसेना. आज मराठी भाषा दिन आहे. काल महाशिवरात्र आहे, त्याआधी शिवजयंती झाली. आता गुढी पाडवा येणार. आपल्या फोनवर मेसेज येतील हॅपी गुढीपाडवा वगैरे. मला तर वाटतं आहे की शुभेच्छा मराठीत द्यायला पाहिजेत त्याची गरज आहे. या दिवशी कुसुमाग्रज यांच्या कविता आपण ऐकत असतो. मराठी भाषा गौरव दिन आपण उत्सवासारखा साजरा करतो.

कुठेतरी एक चिंतेची किनारही लागली आहे. कारण गद्दारी करुन आपलं सरकार पाडल्यानंतर हमे मराठी नहीं आती हे आपल्याला ऐकून घ्यावं लागतं. असं जिथे ऐकू जाईल तिथे त्याच्या कानाखाली मराठीचा आवाज उमटला पाहिजे. महाराष्ट्र गीत वगैरे नुसतं ऐकत जायचं का आपण? ते वा वा करण्यासाठी नाही. त्या गाण्यात महाराष्ट्राचं वर्णन आहे त्याप्रमाणे वागा. तसं वागलो तर मराठी भाषेलाही आपला अभिमान वाटेल. मराठी साहित्य संमेलन दिल्लीत पार पडलं. त्यात पंतप्रधान जे बोलले ते बोलले. पण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा तारा भवाळकर यांच्या भाषणावर चर्चा व्हायला होती. मला त्यांचं भाषण आवडलं कारण राज्याला दिशा दाखवणारं ते भाषण होतं. मी जैविक नाही म्हणणाऱ्यावर आपण विश्वास ठेवायचा का? जो म्हणतो मला भगवान ने भेजा है त्याच्यावर आपण विश्वास ठेवतो. साधू संतांनी आपल्याला जगावं कसं हे सांगितलं आणि दाखवून दिलं. भवाळकर यांनी कुंकू याबाबतही बोलल्या. माझ्या आजोबांच्या विचारांशी मिळतेजुळते त्यांचे विचार आहेत. असंही उद्धव ठाकरे म्हणाले.एका बाजूला आपण मंगळावर यान गेलं म्हणून आपण फटाके वाजवतो. मंगळवार यान उतरत असताना पृथ्वीवर आपण माणसाच्या पत्रिकेत मंगळ शोधत असतो.

मंगळावर माणूस आणि माणसाच्या पत्रिकेत मंगळ नेमकं जायचं आहे कुठे तुम्हाला? चांगला नागरिक म्हणून जगायला शिकवणं म्हणजे संस्कार असतात. आत्ताही मला गंगेचं पाणी दिलं. नमामी गंगा वगैरे सगळं आहे. मी गंगेमध्ये जाऊन स्नान करुन आलो पण

### मराठी शाळा बंद पडत आहेत

वाचून बोलायची सवय नाही कारण तसं बोलायची सवय असती तर कदाचित मी.. ते जाऊदे. मराठी शाळा बंद पडत आहेत, दुर्दैव आहे. माझीही मुलंही इंग्रजी शाळेत शिकली आहेत. तेव्हा काहूर उठलं होतं मराठी मराठी करणाऱ्यांची मुलं इंग्रजी शाळेत जातात. पण आज तुम्हाला सांगतो आदित्य आणि तेजसला उभं करा बघा ते कसं मराठी बोलतात. याचं कारण घर आणि घरातले संस्कार आहेत. आदित्यला इंग्रजी शाळेत प्रवेश घेण्यासाठी जात होतो तेव्हा मला आणि रश्मीला बाळासाहेबांनी सांगितलं होतं की इंग्रजी शाळेत, घरात मराठी. तसंच डॅडी वगैरे नाही घरात आई आणि बाबा असंच म्हणायचं.

इकडे ५० खोके घेतले आणि तिकडे डुबकी मारुन आलो त्याचा उपयोग काय? महाराष्ट्राशी गद्दारी करायची आणि तिकडे जाऊन डुबकी मारुन यायची. काहीही झालं कितीही डुबक्या मारल्या तरीही गद्दारीचा शिक्का तसाच राहणार आहे.मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे. या राजधानीतल्या रंगभूमीने मोठं योगदान दिलं आहे. त्या त्या वेळी आवश्यक असलेली नाटकं आणली गेली आणि समाजाने काय केलं पाहिजे हे शिकवलं. बाळासाहेबांचे विचार सांगणारे दुबईला जाऊन क्रिकेटची मॅच बघणारे लोक आम्हाला सांगत आहेत. हिंदुस्थान पाकिस्तान मॅच कुठेही असली तरीही आम्ही जाऊ मॅच पाहू. सगळे तिकडे जाऊन मॅच बघत आहात आणि परत येऊन आम्हाला बाळासाहेबांचे विचार शिकवता. मंत्रिपद मिळालं नाही म्हणून गावी जाऊन बसता मग मराठी रंगभूमिचं दालन का होऊ देत नाही? आम्ही उपऱ्यांना घुसू देणार नाही असा इशारा उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदेंना दिला.कुसुमाग्रजांच्या दोन ओळी लिहून आणल्या आहेत.

---

# न्यू इंडिया को ऑपरेटिव्ह बँकेत अपहार

## अपहाराप्रकरणी दोन आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**'न्यू इंडिया को ऑप बँक' अपहाराप्रकरणी अटक करण्यात आलेला बँकेचा महाव्यवस्थापक व लेखा विभागाचा प्रमुख हितेश मेहता व बांधकाम व्यावासायिक धर्मेश पौन यांना गुरूवारी न्यायालयापुढे हजर करण्यात आले. त्यावेळी न्यायालयाने त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली आहे. गरज पडल्यास आर्थिक गुन्हे शाखा दोन्ही आरोपींचा पुन्हा ताबा घेणार आहेत.**




याप्रकरणी प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी देवर्षी घोष यांच्या तक्रारीवरून दादर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. त्यात १२२ कोटी रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी बँकेचा महाव्यवस्थापक हितेश मेहता याला आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली.मेहताकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे बांधकाम व्यावसायिक धर्मेश पौन याला पोलिसांनी अटक केली. अपहाराच्या रक्कमेतील ७० कोटी रुपये मेहताने पौनला दिल्याचा संशय आहे. गैरव्यवहार सुरू असतानाही त्याच्याकडे कानाडोळा करणारे बँकेचे माजी सीईओ अभिमन्यू सुरेंद्र भोअन यांनाही आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली होती. त्याला याप्रकरणात एक ते दोन कोटी रुपये मिळाल्याचा संशय आहे. याशिवाय याप्रकरणात अरूण भाई नावाच्या व्यक्तीचा शोध सुरू असून त्याला ४० कोटी रुपये मिळाल्याचे मेहताने सांगितले आहे.या गैरव्यवहारातील १२२

### 122 कोटी रुपयांचा अपहार

मुख्य कार्यकारी अधिकारी देवर्षी घोष यांच्या तक्रारीवरून दादर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. त्यात १२२ कोटी रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी बँकेचा महाव्यवस्थापक हितेश मेहता याला आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली.मेहताकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे बांधकाम व्यावसायिक धर्मेश पौन याला पोलिसांनी अटक केली.


कोटी रुपयांपैकी ७० कोटी रुपये बांधकाम व्यावसायिक पौनला मिळाले होते. त्याने ते चारकोप येथील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत गुंतवल्याचे मेहताने चौकशीत सांगितले आहे. याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा बँकेचे लेखापरिक्षण करणाऱ्या सहा लेखा परिक्षण करणाऱ्या कंपन्यांशी संबंधीत व्यक्तींची चौकशी करत आहे. त्यासाठी त्यांना समन्स बजावण्यात आले आहे.'न्यू इंडिया को ऑप बँक' अपहाराप्रकरणी अटक करण्यात आलेला बँकेचा महाव्यवस्थापक व लेखा विभागाचा प्रमुख हितेश मेहता व बांधकाम व्यावासायिक धर्मेश पौन यांना गुरूवारी न्यायालयापुढे हजर करण्यात आले. त्यावेळी न्यायालयाने त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली आहे. गरज पडल्यास आर्थिक गुन्हे शाखा दोन्ही आरोपींचा पुन्हा ताबा घेणार आहेत.

# निवडणूक आयोगाबद्दल आदर होता!

## भाजपाचा विजयरथ रोखण्यासाठी ममताच्या पक्षाने कसली कंबर

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारतीय जनता पक्षाने महाराष्ट्रा आणि दिल्ली विधानसभा निवडणुकीत मिळवलेला विजय हा बनवट मतदार वापरून मिळवला असल्याचा आरोप पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी गुरूवारी उपस्थित केला. कोलकाता येथील नेताजी इनडोर स्टेडियममध्ये तृणमूल कार्यकर्त्यांच्या बैठकीत बोलताना बॅनर्जी यांनी हा आरोप केला आहे. यावेळी ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालमधील २०२६ च्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर २९४ पैकी २९४ जागा जिंकण्याचे ध्येयही त्यांनी बोलून दाखवले. २०२१ मध्ये ममता बॅनर्जी यांच्या पक्षाने २१४ जागा जिंकल्या होत्या.**



“मी अभिषेक (पक्षाचे खासदार अभिषेक बॅनर्जी) यांच्याशी सहमत आहे. आपण २०२१ मध्ये जिंकल्या होत्या त्यापेक्षा किमान एक जागा जास्त जिंकली पाहिजे. आपल्याला २१५ जागा तर मिळाल्याच पाहिजेत आणि आपण त्याहून अधिक जिंकण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. भाजपा, सीपीआयएम आणि काँग्रेसच्या उमेदवारांचा पराभव होईल किंवा निवडणुकीत त्यांचे डिपॉझिट होईल याची आपण काळजी घेऊ,” असेही बॅनर्जी म्हणाल्या.यावेळी ममता बॅनर्जी यांनी भाजपावर टीका देखील केली, तसेच त्यांनी तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना मतदार यादीची प्रत्यक्ष पडताळणी सुरू करण्यास सांगितले. ममता बॅनर्जी यांनी भारतीय निवडणूक आयोगाच्या (ECI) आशीर्वादाने मतदार याद्यांमध्ये फेरफार केल्याचा आरोपही केला. निवडणुकीची तयारी करताना पक्षाच्या कार्यकर्त्यांचे आणि नेत्यांचे हे पहिले काम असेल असेही त्या म्हणाल्या. “बूथ कार्यकर्त्यांनी तात्काळ हे काम करायला सुरुवात करावी. जिल्हाध्यक्षांनी या प्रक्रियेवर देखरेख करावी आणि सात दिवसांच्या आत याबद्दलचा अभिप्राय द्यावा,” असेही ममता बॅनर्जी म्हणाल्या. ममता बॅनर्जी यांनी यावेळी मतदार याद्यांच्या पडताळणीवर देखरेख ठेवण्यासाठी खासदार, आमदार आणि इतर काही नेत्यांची उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा देखील केली. भारतीय जनता पक्षाने निवडणुका जिंकण्यासाठी बनावट मतदारांचा वापर केल्याच्या त्यांच्या दाव्याबद्दल बोलताना ममता बॅनर्जी म्हणाल्या की, “महाराष्ट्रातील पक्षांना (भाजपा सोडून) हे कसे आढळून आले नाही, दिल्लीतील पक्षांच्या हे लक्षात आले नाही. पण आमच्या हे लक्षात आले आहे. महाराष्ट्र आणि दिल्लीत विजय (भाजपाने) अशाप्रकारे मिळवला.”ममता बॅनर्जी यांनी व्यासपीठावरून एक यादी देखील दाखवली आणि दावा केला की, ही यादी बनावट मतदारांची आहे. त्या म्हणाल्या की, “माझ्याकडे सर्व जिल्ह्यांमधील उदाहरणे आहेत. पश्चिम बंगालमधील रहिवाशांप्रमाणेच हरियाणा आणि गुजरातमधील लोकांची नावे यामध्ये आहेत, त्यांच्या सारख्याच EPIC सह (इलेक्शन फोटो आयडेंटी कार्ड) आहेत. बनावट मतदार ऑनलाइन वाढवले जातात.” ममता बॅनर्जी यांनी आरोप केला की भाजपा निवडणूक आयोगावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करत आहे. त्या म्हणाल्या की, “मला निवडणूक आयोगाबद्दल आदर होता. पण आता असे दिसते की तो (निवडणूक आयोग) भाजपाच्या विचारांच्या लोकांनी भरलेला आहे. नवीन मुख्य निवडणूक आयुक्त (ज्ञानेश कुमार) हे यापूर्वी केंद्रीय गृहमंत्र्यांच्या अंतर्गत सहकार विभागात सचिव होते. आपण दिल्लीतील निवडणूक आयोगाच्या कार्यालयाजवळ धरणे देखील बसू शकतो हे विसरू नका,” असेही त्या यावेळी म्हणाल्या.

### भाजपा आणि काँग्रेसच्या उमेदवारांचा पराभव होईल

भाजपा, सीपीआयएम आणि काँग्रेसच्या उमेदवारांचा पराभव होईल किंवा निवडणुकीत त्यांचे डिपॉझिट होईल याची आपण काळजी घेऊ,” असेही बॅनर्जी म्हणाल्या.यावेळी ममता बॅनर्जी यांनी भाजपावर टीका देखील केली, तसेच त्यांनी तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना मतदार यादीची प्रत्यक्ष पडताळणी सुरू करण्यास सांगितले. ममता बॅनर्जी यांनी भारतीय निवडणूक आयोगाच्या (ECI) आशीर्वादाने मतदार याद्यांमध्ये फेरफार केल्याचा आरोपही केला. निवडणुकीची तयारी करताना पक्षाच्या कार्यकर्त्यांचे आणि नेत्यांचे हे पहिले काम असेल असेही त्या म्हणाल्या. “बूथ कार्यकर्त्यांनी तात्काळ हे काम करायला सुरुवात करावी. जिल्हाध्यक्षांनी या प्रक्रियेवर देखरेख करावी आणि सात दिवसांच्या आत याबद्दलचा अभिप्राय द्यावा,” असेही ममता बॅनर्जी म्हणाल्या. ममता बॅनर्जी यांनी यावेळी मतदार याद्यांच्या पडताळणीवर देखरेख ठेवण्यासाठी खासदार, आमदार आणि इतर काही नेत्यांची उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा देखील केली.

# लाखोंच्या साक्षीने महाकुंभ समाप्त

## 45 दिवसांमध्ये 65 कोटी भाविकांनी स्नान केल्याचा दावा

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था । महाईन्यूज ।

**देशभरातून आलेल्या मोठ्या संख्येतील भाविकांनी ‘हर हर महादेव’च्या जयघोषात बुधवारी महाशिवरात्रीला त्रिवेणी संगमावर पवित्र स्नानाचा लाभ घेतला. सरकारने प्रसृत केलेल्या आकडेवारीनुसार, मंगळवारी मध्यरात्रीपासून सकाळी १० वाजेपर्यंत ८१ लाखांपेक्षा जास्त भाविकांनी स्नान केले. १३ जानेवारीपासून सुरू झालेला आणि गेले ४५ दिवस सुरू असलेला हा धार्मिक सोहळा महाशिवरात्रीच्या मुहूर्तावर समाप्त झाला.**



पौष पौर्णिमाला प्रारंभ झालेल्या या उत्सवात नागा साधूंची भव्य मिरवणूक आणि तीन अमृत स्नान झाले. सरकारने दिलेल्या आकेडवारीनुसार, यावर्षी प्रयागराज कुंभमध्ये ६५ कोटींहून अधिक भाविकांनी स्नान केले. जगातील सर्वात मोठा अध्यात्मिक मेळावा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, कुंभमेळ्यात अखेरच्या दिवशीही देशभरातील लाखो भाविकांनी हजेरी लावली. महाशिवरात्रीला प्रयागराजमध्ये खास उभारण्यात आलेल्या महाकुंभनगरमध्ये चहूबाजूंनी ‘हर हर महादेव’, ‘जय महाकाल’चा गजर होत होता. महाशिवरात्री हा उत्सव शिव-पार्वती यांच्या दैवी मिलनाचे प्रतीक असून कुंभमेळ्याच्या संदर्भात तिचे विशेष महत्त्व आहे. दरम्यान, संगम, घाट परिसर आणि पाची शिवालय परिसरात गर्दीच्या व्यवस्थापनासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त असल्याची माहिती पोलिस महासंचालक (कुंभ) वैभव कृष्णा यांनी दिली. दुसरीकडे, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी पहाटे ४ वाजता गोरखपूर येथून वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांसमवेत कुंभमेळ्यातील व्यवस्थेवर देखरेख ठेवायला सुरुवात केली. यावेळी त्यांनी ‘एक्स’वरून साधूसंत आणि भाविकांना पवित्र स्नानासाठी शुभेच्छा दिल्या.कुंभ काळात हेलिकॉप्टरने भाविकांवर पुष्पवृष्टी करण्याची व्यवस्था करण्यात आली. भाविकांवर पाचवेळा वीस क्विंटल फुलांचा वर्षाव करण्यात आला. महाकुंभातील शेवटचे पवित्र स्नान असल्याने मध्यरात्रीपासूनच संगम किनारी भाविकांची अलोट गर्दी झाली होती. काही भाविक ब्रह्म मुहूर्तावर स्नान करण्यासाठी थांबले होते, तर अनेक भाविकांनी नियोजित वेळेपूर्वीच स्नान केले. उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये ४५ दिवस चाललेल्या महाकुंभमेळ्याची नुकतीच सांगता झाली. या महाकुंभमेळात जगभरातील कोट्यवधी भाविकांनी श्रद्धेने आणि भक्तीने त्रिवेणी संगमात स्नान केले. गुरुवारी महाकुंभमेळ्याच्या समारोपप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, एकतेचा महान यज्ञ पूर्ण झाला आहे. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी महाकुंभमेळ्यादरम्यान भाविकांना झालेल्या गैरसोयीबद्दल दिलगिरी व्यक्त करत माफी मागितली.

### ...तर माफी मागतो : पंतप्रधान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत लिहिले की, ‘महाकुंभ संपन्न झाला... एकतेचा महायज्ञ संपन्न झाला.’ प्रयागराजमधील ४५ दिवस चाललेल्या एकतेच्या महाकुंभात १४० कोटी देशवासीय ज्या पद्धतीने एकाच वेळी एकत्र आले, ते सर्वोत्तम होते. मला माहिती आहे, इतका मोठा कार्यक्रम आयोजित करणे सोपे नव्हते.

# अंकिताच्या लग्नाला राज ठाकरे गैरहजर

'कोकण हार्टेड गर्ल' अर्थात अंकिता वालावलकर सध्या वैवाहिक जीवन एन्जॉय करताना दिसत आहे. १६ फेब्रुवारीला अंकिताचा मोठ्या थाटामाटात लग्नसोहळा पार पडला. संगीतकार कुणाल भगतशी अंकिताने लग्नगाठ बांधून आयुष्याच्या नव्या वाटेवर पाऊल ठेवलं. अंकिता आणि कुणालच्या लग्नाला प्रसिद्ध इन्फ्लुएन्सरसह कलाकार आणि राजकारणातील मंडळींनी खास उपस्थिती लावली होती. पण, मनसे अध्यक्ष राज ठाकरे गैरहजर होते. त्यामुळे राज ठाकरे यांनी अंकिताच्या वडिलांना पत्र लिहून दिलगिरी व्यक्त केली होती आणि लग्नाला उपस्थित न राहण्यामागचं कारण सांगितलं होतं.अंकिता वालावलकरने लग्नाची सर्वात आधी बातमी मनसे अध्यक्ष राज ठाकरेंना सांगितली होती. तसंच त्यानंतर लग्नाची पत्रिका देण्यासाठी अंकिता कुणालसह राज ठाकरेंच्या निवासस्थानी गेली होती. याचा फोटो तिने सोशल मीडियावर शेअर केला होता. नुकताच अंकिताने इन्स्टाग्राम स्टोरीवर राज ठाकरेंच्या पत्राचा फोटो शेअर केला आहे. या पत्राद्वारे राज ठाकरेंनी अंकिताला लग्नाच्या शुभेच्छा देत दिलगिरी व्यक्त केली आहे.राज ठाकरेंनी अंकिताचे वडील प्रमोद वालावलकर यांना पत्र लिहिलं होतं. या पत्रात त्यांनी लिहिलेलं की, आपली कन्या चि. सौ. कां अंकिता हिच्या शुभ विवाहाचे आपण अगत्यपूर्वक पाठविलेलं निमंत्रण मिळालं, त्याबद्दल धन्यवाद. सदर मंगल सोहळ्यास उपस्थित राहण्यास निश्चित आनंद वाटला असता. परंतु पूर्वनियोजित दौऱ्यामुळे उपस्थित राहता येत नसल्यामुळे मी दिलगिरी व्यक्त करतो. आम्हा उभयतांकडून नव दांपत्यास शुभेच्छा. तसेच पुढील वैवाहिक आयुष्य सुखः समृद्धी व भरभराटीचे जावो ही आई जगदंबे चरणी प्रार्थना. आपला नम्र, राज ठाकरे.राज ठाकरेंनी हे



# १०-१२ वीला टक्केवारी किती?

'तुला शिकवीन चांगलाच धडा' (TULA SHIKVIN CHANGLACH DHADA) ही मालिका आज लोकप्रियतेच्या शिखरावर आहे. या मालिकेत अभिनेत्री शिवानी रांगोळे प्रमुख भूमिका साकारली आहे. त्याबरोबरच अभिनेता हृषिकेश शेलार, लोकप्रिय अभिनेत्री कविता मेढेकर, स्वप्नील राजशेखर हे कलाकारही इतर प्रमुख भूमिकांत दिसत आहेत. कविता मेढेकर यांनी तुला शिकवीन चांगलाच धडा या मालिकेत भुवनेश्वरी ही नकारात्मक भूमिका साकारली आहे. अभिनेते स्वप्नील राजशेखर यांनी चारुहास आणि हृषिकेश शेलारने अधिपती ही भूमिका साकारली आहे. अधिपती अशिक्षित असल्याचे पाहायला मिळत आहे. तर, अभिनेत्री शिवानी रांगोळेने यामध्ये अक्षरा ही भूमिका साकारली आहे. अक्षरा ही शाळेतील शिक्षिका असून, तिचे अशिक्षित असलेल्या अधिपतीबरोबर लग्न झाल्याचे मालिकेत पाहायला मिळाले.मालिकेत शिक्षिकेची भूमिका साकारणाऱ्या शिवानी रांगोळेला दहावी व बारावीला किती मार्क्स होते माहीत आहे का? आता अभिनेत्रीने एका मुलाखतीत तिच्या दहावी व बारावीतील टक्केवारीबद्दल खुलासा केला आहे. अभिनेत्री शिवानी रांगोळे आणि तिचा पती व अभिनेता-दिग्दर्शक विराजस कुलकर्णी यांनी सर्व काही या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती. यावेळी विराजस व शिवानीला एकमेकांबद्दल काही सलग प्रश्न विचारण्यात आले. यावेळी विराजसला शिवानीचे दहावी-बारावीचे गुण विचारण्यात आले. त्यावर विराजसने माहीत नसल्याचे सांगितले. शिवानीने त्यावर आठवणींमध्ये रमत, "मला दहावीला ९४ टक्के होते; पण बारावीला माझी मालिका चालू होती. मी प्रवासात वगैरे अभ्यास केला. मी आर्ट्सला होते. मला ७२ टक्के वगैरे असे मार्क्स होते", असे म्हणत आई शिक्षिका असून तिने मला स्पष्ट सांगितलेले की, स्पर्धा वगैरे करतेस ते सगळं ठीक आहे. पण, अभ्यास झालाच पाहिजे, अशी माहिती दिली. विराजसनेदेखील तिचे पाठांतर चांगले असल्याचे म्हणत शिवानीचे कौतुक केले.याबरोबरच या जोडप्याने त्यांची लव्ह स्टोरी, डेटिंगला कधी सुरुवात केली, त्यांची भविष्यासाठी काय ध्येये आहेत, याबद्दल खुलासा केला. विराजस कुलकर्णी सध्या वरवरचे वधू-वर या नाटकामुळे चर्चेत आहे.



# अभिनेत्री शरयू सोनावणे काय म्हणाली?

एखाद्या मालिकेत जसे सकारात्मक पात्र असतात, तसेच नकारात्मक पात्रही असतात. प्रेक्षकांकडून जितका नकारात्मक पात्रांचा तिरस्कार केला जातो, तितकीच त्यांची भूमिका यशस्वी मानली जाते. एखादी कलाकृती पूर्ण होण्यासाठी हरतऱ्हेच्या भूमिका महत्वाच्या असतात. आता झी मराठी वाहिनीवर प्रदर्शित होणारी 'पारू'(PAARU) ही लोकप्रिय मालिकांपैकी एक आहे. या मालिकेत पारू ही गुणी, सर्वांचा मान-सन्मान करणारी, आपल्या माणसांवर प्रेम करणारी, त्यांची काळजी करणारी, त्यांच्यावर कोणते संकट येऊ नये म्हणून सातत्याने प्रयत्न करणारी, कुटुंबाआधी कोणत्याही संकटाला स्वत: सामोरे जाणारी अशी ही पारू सर्वांचे मन जिंकते. तर दुसरीकडे दिशा व अनुष्का या नकारात्मक वाटतात. सतत काही ना काही कट कारस्थान करताना दिसतात. दुसऱ्यांचे नुकसान करून त्यांना छान वाटते, समाधान मिळते. आता या मालिकेतील अभिनेत्रींनी एकमेकींच्या भूमिकेबद्दल वक्तव्य केले आहे. पारू या मालिकेत अभिनेत्री शरयू सोनावणेने पारू ही भूमिका साकारली आहे. पूर्वा शिंदेने दिशा ही भूमिका साकारली आहे, तर अभिनेत्री श्वेता खरातने अनुष्काने ही भूमिका साकारली आहे. या तीन अभिनेत्रींनी कलाकृती मीडियाबरोबर संवाद साधला. यावेळी त्यांना कोणाची भूमिका करायला आवडेल असे विचारले. श्वेताला दिशा ही भूमिका करणार का? असे विचारल्यानंतर अभिनेत्रीने म्हटले की, ती पावरहाऊस आहे. नाही येणार मला. ती भूमिका करताना मी दमून जाईल.शरयू सोनावणेने कोणती भूमिका करायला आवडले यावर बोलताना म्हटले, "पारूला पारू ही भूमिकाच करायला आवडेल.

# सायलीची मधूभाऊंसाठी पोस्ट

जुई गडकरी व अमित भानुशाली यांच्या प्रमुख भूमिका असलेली ठरलं तर मग ही मालिका प्रेक्षकांची लाडकी झाली आहे. मालिकेचे कथानक, पात्रे, कलाकारांचा सहज अभिनय यांमुळे ही मालिका सर्वांच्याच पसंतीस उतरली आहे. या मालिकेत सतत काही ना काही ट्विस्ट येताना दिसतात. अनेकदा या कलाकारांचे प्रेक्षकांकडून कौतुक होते. त्यांच्या सोशल मीडियावरील पोस्ट प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतात. या मालिकेत जुई गडकरीने सायली ही भूमिका साकारली आहे; तर अभिनेते नारायण जाधव यांनी मधुकर पाटील ही भूमिका साकारली आहे. अनाथाश्रमातील सायलीला मधूभाऊ वडिलांची माया देतात. ती चुकली, तर तिला हक्काने रागावतात, तिच्यावर प्रेम करतात, काळजीने ओरडतात, कधी कधी तिच्या भल्यासाठी कठोर निर्णय घेतात. त्यामुळे मालिकेतील ही जोडी प्रेक्षकांची लाडकी ठरताना दिसते. आता जुईने नारायण जाधव यांच्यासाठी सोशल मीडियावर खास पोस्ट शेअर केली आहे.अभिनेत्री जुई गडकरीने नारायण जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त एक व्हिडीओ शेअर केला आहे. त्यामध्ये मालिकेच्या शूटिंगदरम्यानच्या गमती-जमती, मजा सुरू असल्याचे पाहायला मिळते. हा व्हिडीओ शेअर करीत तिने तिच्या भावनाही व्यक्त केल्या आहेत. जुईने लिहिले, "मामा, आज तुमचा वाढदिवस. तुमच्याबद्दल जितकं लिहावं तितकं कमीच आहे.



# आरसीबीची पराभवाची हॅटट्रिक!

## आरसीबीचा घरच्या मैदानावर गुजरातकडून लाजिरवाणा पराभव

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा WPL 2025 मधील सलग तिसरा पराभव पत्करावा लागला आहे. गुजरातच्या संघाने आरसीबीला १२४ धावांवर रोखले. ही धावसंख्या आरसीबीची प्रथम फलंदाजी करतान उभारलेली सर्वात कमी धावसंख्या आहे. आरसीबीच्या घरच्या मैदानावर सध्या वुमन्स प्रीमियर लीगमधील सामने खेळवले जात आहेत. पण आरसीबीने सलग तिन्ही सामने गमावले आहेत.**




गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा फॉर्म खालावताना दिसत आहे. पहिले २ सामने जिंकून मोसमाची सुरुवात केल्यानंतर संघाने सलग ३ सामने गमावले आहेत. WPL 2025 च्या १०व्या सामन्यात गुजरात जायंट्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध मोठा विजय नोंदवला. बेंगळुरूला १२५ धावांवर रोखल्यानंतर गुजरातने २१ चेंडूत ४ गडी गमावून १२६ धावांचे लक्ष्य गाठले.गुजरात जायंट्सने शानदार गोलंदाजी करत आरसीबीला १२५ धावांवर रोखले. स्मृती मानधनाच्या संघाने आपल्या सर्वात कमी धावसंख्येची बरोबरी केली. आरसीबीने शेवटच्या चार षटकांत केवळ ३४ धावा केल्या आणि दोन विकेट गमावल्या, यावरून गुजरातची भेदक गोलंदाजी दिसून येते. विजयासाठी आसुसलेल्या तळाच्या गुजरात संघाने चेंडूसह चांगली कामगिरी केली.

वेगवान गोलंदाज डिआंड्रा डॉटिन (२/३१) आणि डावखुरी फिरकीपटू तनुजा कंवर (२/१६) यांनी चांगली कामगिरी केली. ॲशले गार्डनर (१/२२) आणि काशवी गौतम (१/१७) यांनी चांगली साथ दिली.गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर गुजरातने झटपट विकेट्सची रांग लावली. पॉवरप्लेमध्ये आरसीबीची धावसंख्या ३ बाद २५ अशी झाली. स्मृती मानधना २० चेंडूत १० धावा, डॅनी व्याट-हॉज ४ चेंडूत ४ धावा आणि एलिस पेरी ४ चेंडूत खातंही न उघडता स्वस्तात बाद झाले. पेरीने मागील चार डावांत तीन अर्धशतकं झळकावली होती. यात ८० हून अधिक धावांच्या दोन डावांचाही समावेश आहे.कनिका आहुजाने २८ चेंडूत २ षटकार आणि एका चौकारासह ३३ धावा केल्या आणि राघवी बिश्तने १९ चेंडूत २२ धावा करत संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. या दोघींनी ३७ चेंडूत ४८ धावांची भागीदारी रचली. जॉर्जिया वेरेहम २० चेंडूत नाबाद २० धावा आणि ऋचा घोष १० चेंडूत ९ धावा यांनी २१ धावांची भागीदारी करत डावावर पुन्हा ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला, परंतु काशवीच्या यॉर्करने घोषला बाद करत गुजरातने सामन्यात पुनरागमन केले.गुजरातची कर्णधार ॲश्ले गार्डनर सामन्याची सामनावीर ठरली.

### आरसीबीला 124 धावांवर रोखले

गार्डनरने ३१ चेंडूत ३ षटकार आणि ६ चौकारांसह ५८ धावा करत मॅचविनिंग खेळी केली. तर लिचफिल्डने ३० धावा केल्या. बेथ मुनी आणि हेमलता १७ आणि ११ धा्वा करत बाद झाले. आरसीबीकडून रेणुकाने २, जॉर्जियाने २ विकेट्स घेतले.कनिका आहुजाने २८ चेंडूत २ षटकार आणि एका चौकारासह ३३ धावा केल्या आणि राघवी बिश्तने १९ चेंडूत २२ धावा करत संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. या दोघींनी ३७ चेंडूत ४८ धावांची भागीदारी रचली. जॉर्जिया वेरेहम २० चेंडूत नाबाद २० धावा आणि ऋचा घोष १० चेंडूत ९ धावा यांनी २१ धावांची भागीदारी करत डावावर पुन्हा ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला, परंतु काशवीच्या यॉर्करने घोषला बाद करत गुजरातने सामन्यात पुनरागमन केले.रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा WPL 2025 मधील सलग तिसरा पराभव पत्करावा लागला आहे. गुजरातच्या संघाने आरसीबीला १२४ धावांवर रोखले.

# पाकिस्तानच्या नावे लाजिरवाणा विक्रम

## चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासात नकोशी कामगिरी करणारा एकमेव संघ

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ ही स्पर्धा यजमान पाकिस्तानसाठी एखाद्या वाईट स्वप्नासारखी ठरली. पाकिस्तानला गट टप्प्यातील एकही सामना जिंकता आलेला नाही. घरच्या मैदानावर स्पर्धा होत असूनही पाकिस्तान फेल ठरला. पाकिस्तानने स्पर्धेतील सुरूवातीचे दोन सामने गमावले, ज्यामुळे स्पर्धेत बाहेर पडण्याची वेळ आली.**




तर तिसरा बांगलादेशविरूद्धचा सामना पावसामुळे रद्द झाला. यासह पाकिस्तानने आपल्या नावे नकोसा विक्रम केला आहे. पाकिस्तान संघाचा तिसरा सामना रद्द होताच संघाच्या नावावर एका लाजिरवाण्या विक्रमाची नोंद झाली आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासात याआधी कोणत्याही पूर्ण सदस्य संघासह असे घडले नव्हते. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये आतापर्यंत एकूण आठ सीझन खेळले गेले आहेत. पण यजमान राष्ट्राने स्पर्धेत एकही सामना जिंकलेला नाही, असे यापूर्वी कधीचं घडले नव्हते. २००० मध्ये, जेव्हा केनियाने आयसीसी नॉकआउट स्पर्धेचे आयोजन केले होते, तेव्हा केनियाचा संघ एकच सामना खेळला पण तो सामनाही संघाने गमावत स्पर्धेतून बाहेर पडला. पण त्यावेळी या स्पर्धेतील सर्व सामने बाद फेरीसारखे खेळले जात होते, जो संघ पराभूत होत असे तो स्पर्धेतून बाहेर जात असे.२००२ मध्ये या स्पर्धेचे नाव आयसीसी नॉकआऊट बदलून चॅम्पियन्स ट्रॉफी करण्यात आले. तेव्हापासून २०१७ पर्यंत, यजमान राष्ट्राने स्पर्धेत एकही सामना जिंकला नाही असे कधीही घडले नाही. पण हा लाजिरवाणा विक्रम चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये पाकिस्तानच्या नावावर झाला, या सीझनमध्ये पाकिस्तान संघ एकही सामना जिंकू शकला नाही.पाकिस्तान या स्पर्धेत दोन सामने खेळला. त्यांचा पहिला सामना न्यूझीलंड विरुद्ध होता, जिथे त्यांचा ६० धावांनी पराभव झाला होता. तर भारताने यजमान संघाचा ६ गडी राखून पराभव केला. त्यांचा शेवटचा गट सामना बांगलादेशविरुद्ध होता, जो पावसामुळे रद्द झाला होता. त्यामुळे पाकिस्तानचा चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५चा प्रवास विजयाशिवाय संपला.चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अ गटातून भारत आणि न्यूझीलंडचे संघ उपांत्य फेरीत पोहोचले आहेत. बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यातील सामना रद्द झाल्यामुळे यजमानांना आणखी एक धक्का बसला आहे.

### फेल ठरलेला पाकिस्तान मालामाल

बांगलादेशविरुद्धचा अखेरचा साखळी सामना देखील रद्द झाला. पाकिस्तानचा संघ गट टप्प्यातून बाहेर पडला असला तरी आयसीसीकडून पाकिस्तान संघाला कोट्यवधींची बक्षिसाची रक्कम मिळणार आहे. ICC चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अ गटातील गुणतालिकेवर पाकिस्तान संघ शेवटच्या स्थानावर आहे. बांगलादेशविरूद्धचा अखेरचा सामना रद्द झाल्याने आता पाकिस्तान संघ अखेरच्या स्थानी एकही सामना न जिंकत राहिला आहे.तरीही आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद म्हणजेच ICC कोट्यवधी रुपये बक्षीस देणार आहे. संघही एकही सामना जिंकलेला नसला तरी आयसीसीच्या परंपरेनुसार त्याला बक्षीस रक्कम म्हटले जाईल. पाकिस्तानला ICC कडून बक्षीस म्हणून सुमारे २ कोटी ३७ लाख रुपये मिळणार आहेत. यामधील १ कोटी २२ लाख रुपये गुणतालिकेत सातव्या आणि आठव्या स्थानावर असलेल्या संघांना मिळणार होते, त्यामुळे पाकिस्तानला ती रक्कम मिळेल.यासह सामना जिंकण्यासाठी प्रत्येक संघाला २९.५ लाख रूपये मिळतील. बांगलादेशविरूद्धचा सामना रद्द झाल्याने दोन्ही संघांना याची अर्धी किंमत मिळेल. म्हणजेच पाकिस्तानला १५ लाख रूपये मिळतील. याशिवाय आयसीसीने यावेळी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये सहभागी होणाऱ्या सर्व संघांना प्रत्येकी १.०८ कोटी स्वतंत्र रक्कम देण्याची घोषणा केली होती.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार ।
। दि. 28 फेब्रुवारी 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## गरजवंतांना मदतीचा हात दिला पाहिजे

# वेळेचे महत्व जाणून योग्य निर्णय घ्या!

### सोनुल कोतवाल : गोहे, आंबेगाव शासकीय आश्रम शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा संपन्न

। पिंपरी । प्रतिनिधी । महाईन्यूज

**जीवनात सर्वात मौल्यवान "वेळ" आहे. ज्याला वेळेचे महत्व कळले तो यशस्वी होतो. त्यामुळे सर्वांनी वेळेचे महत्व जाणून योग्य वेळी योग्य निर्णय घ्यावा व आलेल्या संकटावर मात करीत पुढे गेले पाहिजे. आदिवासी वाडी, वस्तीवर सेवा, सुविधा कमी असताना देखील परिस्थितीशी लढा देऊन आपल्या पायावर ठामपणे उभे राहिलेल्या या माजी विद्यार्थ्यांनी तालुक्यात, शहरात व्यवसाय, रोजगार निमित्त स्थायिक झाल्यानंतर पुन्हा मागे वळून गरजवंतांना मदतीचा हात दिला पाहिजे असे मार्गदर्शन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कार्यालय घोडेगावचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी सोनुल कोतवाल यांनी केले.**



एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कार्यालय घोडेगाव संचालित शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा कला व विज्ञान विद्यालय, गोहे बुद्रुक, तालुका आंबेगाव येथील सन २००३ ते २०२५ च्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा रविवारी (दि.२३) गोहे बुद्रुक येथील आश्रम शाळेत आयोजित करण्यात आला होता. यावेळी सुमारे ७० पेक्षा जास्त माजी विद्यार्थी व आजी, माजी शिक्षक, शालेय विद्यार्थी तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या माजी विद्यार्थ्यां मेळाव्यात मुख्याध्यापक सुखदेव अरसुळे, माजी मुख्याध्यापक रमेश कारले, भास्कर लोखंडे, प्राथमिक शाळेचे शिक्षक शोभा जाधव, राणी गाडेकर, प्रा. मीनाक्षी शहाणे, वसतिगृह अधीक्षिका माधुरी सगर, प्रवीण शिंदे, कला व वाणिज्य विद्यालयाचे प्रा. भारती सुशीलकुमार, विलास साबळे, गावचे सरपंच तुकाराम भवारी व ग्रामस्थ उपस्थित होते. आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडा, राघोजी भांगरे, तंट्या भील, राणी दुर्गावती महादू कातकरी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून मेळाव्यात सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी इशस्तवन व स्वागत गीत सादर करून स्वागत केले. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी वसतीगृहासाठी दूरदर्शन संच व वार्षिक इंटरनेट सुविधा भेट दिली. माजी मुख्याध्यापक रमेश कारले यांनी मनोगतात शाळेच्या मागील पंचवीस वर्षाचा आढावा घेताना सांगितले की, या शाळेतील अनेक विद्यार्थी शासकीय उच्च पदावर अधिकारी व कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. विज्ञान शाखेची उच्च माध्यमिकची शाखा स्थगित करण्यात आली होती, ती सुरू करण्यास मला यश आले त्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी देखील सहकार्य केले.

विद्यालयाचे प्रा. भारती सुशीलकुमार यांनी शाळेचा नावलौकिक वाढवण्यात माजी विद्यार्थ्यांचा मोलाचा वाटा आहे. या शाळेचे माजी विद्यार्थी कला, वाणिज्य क्षेत्र बरोबरच स्पर्धा परीक्षेत यश मिळवून शासकीय सेवेत व काही उद्योग, व्यवसायात आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करून शाळेचे नाव उज्वल करीत आहेत.

प्रा. विलास साबळे यांनी माजी विद्यार्थी संघटनेचे सभासद किरण तळपे, विक्रम वांगधर, संतोष दांगट, विक्रम गवारी, संतोष घोडे या माजी विद्यार्थ्यांशी संपर्क साधून योग्य समन्वय करीत मेळाव्याच्या आयोजनात पुढाकार घेतला. भास्कर जगदाळे, अश्विनी लोहकरे, दत्ता केंगले, मुकुंद कोकणे, दिलीप आंबवणे, संदीप गवारी, सारिका भिंगे, अर्चना सोनवणे, इंद्रसेन बांबळे या माजी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे मनोगत व्यक्त केले. आपण शिकलेल्या विभागामध्ये, वर्गात, वसतीगृह येथे जाऊन आपल्या शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भेटून विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. सर्वांनीच आपल्या आठवणीचा ठेवा कॅमेरात कैद करून ठेवला. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. प्रास्ताविक किरण तळपे, सूत्रसंचालन संतोष घोडे व आभार विक्रम वांगधर यांनी मानले.

# उपक्रम यशस्वी होण्यासाठी लोक सहभाग आवश्यक

### प्रदिप जांभळे पाटील : एस. बी. पाटील मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटच्या 'युवोत्सव - 2025'चे उद्घाटन

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**कोणताही उपक्रम यशस्वी होण्यासाठी लोक सहभाग आवश्यक आहे असे मत अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील यांनी व्यक्त केले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित निगडी येथील एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या वतीने आयोजित 'युवोत्सव २०२५' या क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन गुरूवारी (दि.२७ ) सोनाली कुलकर्णी आणि पिंपरी चिंचवड मनपाचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आर. जे. अक्षय, पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, एसबीपीएमच्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर आदी उपस्थित होते. युवोत्सव स्पर्धेचे हे दहावे वर्ष असून यामध्ये फुटबॉल, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, बॉक्स क्रिकेट या स्पर्धा होणार आहेत. युवोत्सव क्रीडा स्पर्धेमध्ये पुणे परिसरातील पदवी आणि पदव्युत्तर महाविद्यालयामधील संघ सहभागी झाले आहेत. विजयी संघांना आकर्षक बक्षिसे व रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत, असे डॉ. किर्ती धारवाडकर यांनी सांगितले. जांभळे पाटील म्हणाले महापालिकेने अनेक क्रीडांगणे विकसित केली आहेत. यामध्ये विविध क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. खेळाडूंनी याचा लाभ घ्यावा, यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका प्रयत्न करत आहे, असे उपक्रम यशस्वी होण्यासाठी लोक सहभाग आवश्यक आहे.युवोत्सवाच्या माध्यमातून शिक्षणाबरोबरच कला, क्रीडा गुणांना वाव देऊन भारताचे जबाबदार नागरिक घडविण्याचे कार्य पीसीईटी करीत आहे. युवोत्सवाचा समारोप शनिवारी १ मार्च रोजी होणार आहे, असे डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सहभागी संघ आणि खेळाडूंचे स्वागत करून स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेच्या आयोजनात डॉ. अनिषकुमार कारिया, डॉ. काजल माहेश्वरी, डॉ. अमरीश पद्मा यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी खेळाडू, विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन आणि आभार पायल झोरे, सुरज पाटील यांनी मानले.

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education

EDUCATING **MIND & HEART**

**ADMISSIONS OPEN**
**FOR AY 2025-26**

# Holistic Empowering Learning

IT ALL **STARTS HERE**



**42** YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION

**55+** NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS

**11+** CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA

**17K+** 17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES

**600+** TEACHING AND NON TEACHING STAFF

**13K+** 13,000 ALUMNI ACROSS GLOBE

**PRIYADARSHANI** GROUP OF SCHOOLS

BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA

+91 8668755826

alandi@priyadarshanischools.org

www.priyadarshanischools.org


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
TOMORROW'S
LEADERS
ARE MADE HERE
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School & Jr. College
779 676 7292
BRANCHES AT: DHANORE | CHARHOLI | MOSHI


WTE
Provider of Sustainable
Water and Waste Water Treatment Solution Globally


Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!